MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. II



## VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor

Dr.B.K.Shep
Dr.R.D.Rathod
Dr.K.M.Bhange

42) भटक्या 'मरीआईवाला' जमातीतीलस्त्रियांचीसद्यस्थिती
प्रा.जयश्री डंके, निगडी, पुणे ||105

43) आदिम जमातीतील महिलांचा संघर्ष
प्रा. डॉ. एस. ए. टेंगसे, सोनपेठ, जि. परभणी ||107

44) भटके विमुक्त आणि आरक्षण
डॉ. नारायण भोसले, मुंबई विद्यापीठ, मुंबई ||110

45) आदिवासी जीवनाचा ऐतिहासिक आढावा
प्रा. डॉ. अंभुरे एस. डी., सोनपेठ. जि परभणी ||113

46) वासुदेव समाजाचा प्रारंभिक इतिहास
प्रा. डॉ. बी. पी. बोंगार्डे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग ||115

47) महाराष्ट्रातील वारली व भिल्ल या आदिवासी चळवळीचा अभ्यास
प्रा.डॉ.कदम संतोष तुकाराम, म्हसवड ||117

48) हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक - जीवन व कार्य
डॉ. एच.टी. सातपुते, पालम जि. परभणी ||120

49) महाराष्ट्रातील विमुक्त—भटक्या जाती, जमाती व जातपंचायतीमधील स्त्रियांची स्थिती
ज्योती प्रकाश गावंडे & डॉ. मधुकर चाटसे, वाळुज, ता. गंगापूर. जि.औरंगाबाद ||122

50) विमुक्त — भटक्या जमात — गोपाळ समाजाची समस्या;
प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार, कुरखेडा जिल्हा — गडचिरोली ||126

51) उमरगा शहरातील मसनजोगी जमातीची सद्यस्थिती : एक समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा.अनिल म्हाळाप्पा गाडेकर, ता.उमरगा जि.उस्मानाबाद ||128

52) महाराष्ट्रातील विमुक्त—भटक्या जमातीची सद्यकालीन स्थिती
जाधव श्रीराम दामला ||130

53) महाराष्ट्रातील विमुक्त-भटक्या जाती-जमाती व इतर मागासवर्गीय स्त्रियांची स्थिती
प्रा.श्रीमती सुनिता जगन्नाथ कुकडे, मानवत ||132

54) हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक—जीवन आणि कार्य
प्रा.डॉ.आर.व्ही.मोरे, रिसोड जि.वाशिम ||136

55) महाराष्ट्रातील भटक्या आणि विमुक्त जमातीची सदय:स्थिती
प्रा. चंद्रकांत सुधाकर गांगुर्डे, परभणी ||137

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

43

# आदिम जमातीतील महिलांचा संघर्ष

प्रा. डॉ. एस. ए. टेंगसे
कै. रमेश वरपुडकर महा. सोनपेठ, जि. परभणी

**********

आदिम जामाती हा भारतीय समाजाचे एक अविभाज्य अंग आहते. देशाच्या विकासात त्यांना सहभागी करून घेणे हे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्रात आदिवासींच्या ४७ जमाती आहेत. या पैकी २०११ च्या जणगणेनुसार भिल्ल, गोंड, महादेवकोळी, कोकण, वारली, ठाकुर यांची एकत्रीत संख्या महाराष्ट्रातील एकुण आदिवासींच्या ७३:ए आहे. भील्ल २१:ए गोंड १८.१:ए महादेव कोळी १४.३:, वारली ७.३ कोकणी ६.७: आणि ठाकुर ५.७: अशी लोकसंख्येची विभागणी आहे. महाराष्ट्र एकुण १९ आदिवासी जमाती अशा आहेत ज्यांची संख्या १००० पेक्षा कमी आहे. महाराष्ट्रातील तीन आदिवासी जमाती या आदिम जमाती भारत सरकारणे जाहीर केल्या आहेत, यामध्ये कोलम यवतमाळ जिल्हा, कातकरी ठाणे, रायगड जिल्हा आणि माडिया गोंड गडचीरोली जिल्हा या जमातींचा समावेश आहे.

भारतात जवळजवळ प्रत्येक राज्यात आदिवासी राहतात महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या राज्यांच्या एकुण लोकसंख्येच्या ८.८: एवढी म्हणजे १ कोटी ५ लाख एवढी आहे. देशातील आदिवासी लोकसंख्येच्या ५.१: आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत पूर्वकडील राज्ये सोडल्यास महाराष्ट्र हे मध्यप्रदेश पाठोपाठ दुस—या नंबरचे राज्य आहे, राज्यातील फक्त सुमारे १५ लाख आदिवासी शहरी भागात वास्तव्यास आहेत त्यामुळे ९० लाख आदिवासी हे ग्रामीण तसेच जंगलात आजही राहत आहेत. महाराष्ट्रात मुख्यत: १४ जिल्हयात आदिवासीचे वास्तव्य आहे. विदयार्थातील गडचिरोली, चंद्रपुर, यवतमाळ, नांदेड, नागपुर, गोदीया, भंडारा आणि अमरावती हे जिल्हे तर खानदेशातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशीक, ठाणे आणि रायगड हे जिल्हे मुख्यत: आदिवासी जिल्हे म्हणुण ओळखले जातात.

**शोधनिबंधाचा उद्देश:—**

१. आदिवासी म्हणजे काय हे जाणुण घेणे .

२. भारतातील व महाराष्ट्रातील आदिवासी ची माहीती प्राप्त करणे.

३. आदिवासींच्या समस्या जाणुन धेणे.

४. आदिवासींच्या कायदे अभ्यासणे.

५. आदिवासींसाठी स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**संशोधनपध्दती** :— प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम तथ्य संकलण सामग्रीवर आधारीत आहे.

**आदिवासी म्हणजे काय ?**

''एका विशीष्ट भुप्रदेशात राहणा—या समान बोलीभाषा बोलणारा समान सांस्कशतीक जिवन जगणारा पण अक्षरओळख नसणारा स्थानिक गटांचा समुच्चयास आदिवासी असे म्हणतात. ''या व्याख्येवरून आदिवासींची लक्षणे स्पष्ट होतात. विशिष्ट भुप्रदेश समान बोलीभाषा पण लिपी नाही. निसर्गावर अवलंबुन असलेली अशी वेगळी जिवनपध्दती, साधी अर्थव्यवस्था सामाजिक एकजीनसीपण या वैशीष्टयांमुळे हा समाज वेगळा जाणवतो.

**आदिवासी चळवळी व समस्या:—**

आदिवासींना स्वतंत्र आस्तीत्व आहे या समाजात सामुहीक जीवनपध्दती, सामुहीक निर्णय, जंगलाचे संरक्षण करणे, आवश्यक तीतकेच उत्पादन घेणे, पारंपारीकता जपणे या अनेक बाबी आदिवासींकडुन शिकण्यासारख्या आहेत. आदिवासी हा निसर्गाच्या सानिध्यात राहतो, यांनी कधीही निसर्गाच्या विरूध्द पाउल टाकलेले नाही. निसर्ग नियमा प्रमाणे जगणारा समाज म्हणुण आदिवासी समाज ओळखला जातो. आपणही निसर्गाला समंजुण घेणे आवश्यक आहे. जंगलाचे रक्षण करून त्यांनी समतोल राखला पण आपण वशक्षतोड करून, सिमेंटचे जंगले उभरून निसर्गावर अतिक्रमणच करतो. आदिवासींचे सण, उत्सव, विधी हे निर्सगाला कोणतेही हानी न पोचवता साजरे केले जातात त्यात भरमसाठ खर्च गोंगाट केला जात नाही.

आदिवासी जमाती मध्ये भेडसावणारे प्रश्न अनेक आहेत, जमीनीच्या ताब्याचा प्रश्न, दारिद्रय, कुपोषण, अंधश्रध्दा, अज्ञान, बेरोजगारी, अनारोग्य, व्यसनाधिनता, पिळवणुक, स्त्रीयांवरील आत्याचार हे अनेक प्रश्न त्यांचे जीवन कठीण बनवत आहेत.

आदिवासी चळवळींचा इतीहास आपल्याला चौदाव्या शतकापर्यंत घेउन जातो वेळोवेळी महंमद तुघलक, बिदरचा राजा, बहामनी सरदार, यांच्या विरूध्द एकजुट करून आदिवासींनी आपल्या ताब्यातील जमीनी, किल्ले यांचे रक्षण केले होते. इग्रजांच्या काळातही त्यांना अनेक वेळा लढावे लागले त्या काळात इंग्रज अधिकाऱ्यांना आदिवासींच्या जमीनी हडप करण्यासाठी स्थानीक जमीनदार आणि धनीक मदत करत. १७८८ ते १७९५ या काळात छोटा नागपुर येथे तमाड जमातीने १८१२ मध्ये राजस्थानात भिल्ल जमातीने तसेच १८१८ ते १८३० ईशान्यपुर्व भारतात नागा, मिझो, लुशाई, मिशीपी, दफम्त इ. जमातींनी, बीहारमध्ये मुंडा, कोल, खैरनार जमातींनी १८३२ मध्ये संथलांनी इग्रजांच्या कारखाण्यांना कडाडुन विरोध केला. इग्रजांच्या निर्दयतेने शेतसारा वसुल करण्याच्या पध्दतीला बिरसा मुंडा यांनी आदिवासींना शेतात पेरणीच करू नका असे सांगुण अभिनव पध्दतीने विरोध नोंदवला होता. महाराष्ट्रातही आदिवासी चळवळी पहील्या पासुनच प्रभावी होत्या, याचे कारण नैर्सगीक पणे त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनी, किल्ले आणि निसर्ग संपत्ती ने संतृप्त जंगले

यावर नेहमीच त्या त्या ठिकाणच्या सत्ताधा—यांचा डोळा होता. जंगलातील कच्चामाल इग्रज बाहेर नेत असत त्यापासुन स्वत:चे रक्षण करताना या सर्व जमाती लढाऊ बनल्या त्यातही आदिवासी स्त्रियांचा लढाउपणा काही औरच होता. अगदी इंग्रजांच्या काळातही दाशरीबेने चौधरी, झलकार, राणी दुर्गावती राणी गायदिजनलु, सुदेशा अशा स्त्रियांना स्वातंत्र्य लबयातील आपला वाय उचलला होता असा उल्लेख, डॉ. तुंकराम रोंगटे यांच्या लिखाणात केला आहे.

आदिवासींच्या प्रश्नांची संख्याही अधीक होती दारिद्र कुपोषण, अज्ञान, अनारोग्य बेरोजगारी, व्यसनधीनता, स्त्रीयांचे आत्याचार हे अनेक प्रश्न त्यांचे जगणे कठीन करीत होते या संर्दभात गोदावरी आणि शामराव पुरळेकर यांनी महाराष्ट्रात फार मोठे काम उभाले. गोदावरी व शाम पुरळेकर यांच्या माणूस जेव्हा जागा होतो हे आत्मचरीत्र अत्यंत स्फूर्तिदायक आहे १९४९ मध्ये किसान सभेच्या स्थापने पासुन वयाच्या पंचाहत्तरीपर्यंत त्या डहाणू या दुर्गम आदिवासी भागात काम करीत राहील्या त्यांनी वारली च्या पिळवणुकीचा व वेठबरगारीचा प्रश्न हमी घेतला. त्याकाळी आदिवासी स्त्रिया म्हणजे जणुकाही जमीनदारांची खाजगी मालमत्ताच असे. त्यांना उपाशी ठेवणे मारहाण करणे, नांगराला जुंपणे हे नित्याचेच होते. गोदुताईनी आदिवासींना भयमुक्त होउन त्या विरूध आवाज उठण्यास शिकवले. आदिवासी समाज जोपर्यंत राजकीयदृष्ट्या जागृत होत नाही तोपर्यंत क्रांती अशक्य आहे अशी त्यांची भुमीका होती.

ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांनी ठाणे जिल्ह्यात बोर्डी येथे बालशिक्षणाचा पाया घातला. १९४६ मध्ये त्यांनी म. गाधीजींशी चर्चा करून त्यांनी कामाची दिशा ठरवली. ताराबाई चे विशिष्टय असे की, त्यांनी परिस्थीतीनुसार बालवाडी इ. शिक्षणाचे नमुने तयार केले. आदिवासींसाठी त्यांच्या अंगणातच शाळा सुरू करून अंगणवाडी तर गुरे चारणा—या मुलांसाठी कुरणशाळा, एकाच छपराखली पाळणाघर, बालवाडी, प्राथमीक, शाळा, असलेली विकासवाडी ही संक्लंपणा जन्माला घातली.

आजही भारतात अनेक कार्यकर्त्ये स्त्रिया आदिवासींसाठी काम करत आहेत. मध्य प्रदेशात कत्ठीवाडी इथे साधना ख्रयुबेल शिक्षण प्रसार, व्यसनमुक्ती ग्रामसभा घेण्यास, बचतगट स्थापन करणे असे काम करीत आहेत. राजमंद्रीजवळ अडतीगल्ला या छोटयागावात नफिसा डिसुझा आणि तीचे पती डॉमनिक यांनी तेथील कोंडा रेड्डी कोया दोरास, कोंडा कामरास, या जमाती मध्ये जमिनी हस्ता नरण, शिक्षणाचे प्रश्न यावर काम केले. स्त्रियामधुन नेतृत्व पुढे यावे स्त्रियाना किमान मजुरी मीळावी त्यांना कौशल्य शिक्षन द्यावे त्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. याच गावात अरूना नावाची एक आदीवासी महीला आज मनय सिमा आदिवासी बँकेत सहकारी बँकेची सी ई ओ म्हणुन आत्मविश्वासाने काम करीत आहेत.

छत्तीसगढ बस्तरमध्ये आपल्या जमातीला आपल्या हक्का विषयी जागृत करणारी गोंड जमातीतील पत्रकार सोनी सोरी, जंगल, जमीनी, आणि आदिवासींचे हक्क या साठी लढा देणा—या पहिल्या आदिवासी महीला अंदोलक झिलाबाई यासारख्या या आदिवासींसाठी प्रेरणा स्थान बनल्या आहेत. ज्येष्ठ आदिवासी कार्यकर्ते लेखक कवी, वाहरू सोनवणे असे म्हणतात की, 'आमचा असा अनुभव आहे की, कोणतीही चळवळ स्त्रियांच्या सहभागा शिवाय गतीशील होत नाही'. १९४७ मध्ये सातबारा, पीकपाणी, कायदा, आदिवासींच्या बाजुने होता तरी हिंम्मत कोण करणार असा प्रश्न येत होता. कारण जमीनी धनदांडग्यांच्या हातात होत्या आणि सरकारची त्यांनाच साथ होती एकेका गावातुन शंभर—दिडशे स्त्रियांपुढे यायच्या आणि जमिनीचा ताबा घ्यायच्या कुरूंजी, शिरखेडा भागापुर इ.गावात आशा चळवळी झाल्या. त्या केवळ जमीनीच्या प्रश्नांवर काम करत नाही तर जीवनाच्या विविध प्रश्नांवर काम करीत. व्यसनमुक्ती, दारूबंदी, मजुरी वाढवुन मागणे, अन्याय—आत्याचार विरोधातही त्या पुढे येत असत. असे वाहरूजी म्हणाले. ठगीबाई सरोसतीबाई, विमलाबाई, भुरीबाई, दिकराना, सोनवणे, रूक्माबाई, अशा काही महीला चळवळीसाठी गाणी लिहीत, गात, असत असेही वाहरूजी यांनी सांगीतले नजुबाई गावितया कार्यकर्त्या तसेच लेखीकाही आहेत. कविता आत्राम, शांता किराडे, रंजना पावडा, कुसुम आलाम, उषा किरण आत्राम इ. स्त्रिया लेखनातुन आपला दश्ष्टीकोन व्यक्त करत आहेत असे वाहरूजी (आदिवासी आधिकारी राष्ट्रीयमंचचे सरसचिव म्हणत.)

आजही आदिवासींचे स्त्रियांचे प्रश्न सुटलेले नाहीत, स्त्रियांवर होणारे हल्ले आणि लैंगीक हिंसेचे प्रकार वाढलेले आहेत. जागातिकीकरणाच्या प्रक्रियेत ग्राहकनिष्ठ व्यवस्थेत स्त्रियांचे वस्तुकरण वेगाणे होत आहे. पर्यावरणाचा वेगाने होणारा नाश आदिवासी भागातील जैव वैविधतेचे नुकसान करतो आहे. नष्ट होत चाललेली त्यांची संस्कश्ती त्यावर लादलेला भ्रामक विकास तसेच त्यांच्यावर लादले जात असलेले धर्मांतर हे त्यांच्या समोरचे भीषण प्रश्न आहेत पण आदिवासी व बिगर आदिवासी स्त्रिया या प्रश्नांना सक्षमपणे तोंड देत आहेत.

**संविधान आणि कायदे:—**

आदिवासी विकासाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्याकरीता संविधानात आदिवासींबावत निरनिराळया तरतुदी केल्या आहेत, राज्यातील दुर्बल घटकांचे, विशेषत:अनुसुचित जाती व जमातींचे शैक्षणीक व आर्थिक हितसंबधांचे रक्षणाचे राज्यशासन विशेष काळजी करेल व सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या पिळवणुकी पासुन त्यांचे रक्षण केले जाईल. २३ व्या अनेच्छेदानुसार सक्तीची वेढ बिगारी नाहीशी करणे. राज्यातील अनुसुचीत जमातीच्या कल्याणार्थ आवश्यक त्या योजना आखणे, त्यांची कार्यवही करणे, या साठी राज्य सरकारांना आवश्यक त्या सुचना देण्याचा शासकिय अधिकार केंद्र शासनाने ३३९ व्या अनेच्छेदानुसार केंद्रसरकार आणि राज्यसरकारंच्या खात्यातुन नोकऱ्या

व जागांसंबंधी नेमनुका करतांना शासकिय कार्यक्षमता लक्षात घेउन अनुसुचीत जाती व जमार्तीचे हक्क विभागत घेतले जातील अशी तरतुद आहे. अनुसुचीत सामील झालेल्या जमातींसाठी घटनेत राष्ट्रीय आयोग आरक्षण, आत्याचार प्रतिबंधक कायदा, आदवासी स्वशासन कायदा, जंगल अधिकार कायदा इ. तरतुदी केल्या आहेत. प्रत्यक्षात हे कायदे, किती राबवले जातात आणि आदिवासींना त्यांचा किती फायदा मिळतो हा एक प्रश्न आहे, पण निदान धोरण व कायदा हा शक्य तीतका आदिवासींच्या बाजुने केलेला आहे. अलिकडच्या काळात आदिवासींसाठी दोन महत्वाचे कायदे झाले एक म्हणजे (PESA) यालाच आदिवासी स्वंयशासन कायदा म्हणतात. आणि दुसरा जंगल अधिकार कायदा, या कायदयामुळे आदिवासी समुहांना काही विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

भटक्यांचे भटकेपण सुटण्यासाठी आणि सुस्थिर व व्यवस्थित जीवन जगणे त्यांना सुलभ व्हावे म्हणुन खालील उपाय सुचवता येतील.

१. सर्व भटक्या व विमुक्त जमातींच्या कुटुंबांना कायमस्वरूपी स्थिर करणे जेणे करून स्थिरजीवन त्यांना जगता येईल.

२. या जमातीतील कुटुंबाना कायम स्वरूपी निवा त्यासाठी घर बांधुन देणे व त्यासाठी १००टक्के अनुदान देणे.

३. भटक्या विमुक्त जातींच्या जनगणणेवेळी विस्तृत नोंदी करणे आवश्यक आहे. नेमकी आकडेवारी नसल्याने योजना आखतांना अडचणी येणार नाहीत.

४. भटक्या विमुक्तींसाठी असलेल्या स्वंयसेवी/ अशासकीय संस्थाना सरकारने मदत करणे आवश्यक आहे. जमातीच्या मुलांसाठी आश्रमशाळा चालवणे.

५. जमातीतील तरूणांना विविध प्रकारच्या कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

**सारांशः—**

टादिवासींचा विकास करायचा असेल तर शिक्षणाच्या सोयी सुधारल्या पाहिजेत. मुलींचे आरोग्य त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, मुलींची सुरक्षितता, मुलींचे होणारे लैगिक शोषण थांबले पाहिजे 'पैसा' कायदया अतंर्गत शासनाच्या प्रत्येक खात्यात—केवळ आदिवासी शिक्षीतांची नोकर भरती झाली पाहिजे. दुर्गम भागात दळणवळणांची साधने व पक्के रस्ते बांधणे आवश्यक आहेत. पाझर, तलाव, शेततळी, लघुपाटबंधारे बांधुन पिण्याचा आणि शेतसिंचनाचा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. वाडया, वर हाकेच्या अंतरावर किमान प्राथमीक दवाखाना झाला पाहिजे, शेती विकासाच्या योजना राबवल्या पाहिजे. खोटी जात प्रमाणपत्रे जप्त करून संबंधीतांवर दंडात्मक कारावासाची कार्यवाही झाली पाहिजे. आदिवासी लोकप्रतिनीधी अत्यंत जागरूक राहुन समाजाच्या प्रती असलेली नाळ जोडुण ठेवावी, कारण केवळ आदिवासी समाजामुळे आपल्याला राजकीय सत्ता मिळाली आहे याची जाणीव ठवावी.

**संदर्भ:—**

१. Mohema.com mahjarashtra-blueprint

२. महाराष्ट्र टाइम्स, आदिवासी विकासातील अडथळे व उपाययोजना डॉ. गवारी, ९ ऑगस्ट २०१६

३. https//www.loksatta.com tribal

४. दै. लोकसत्ता, आदिवासी चळवळ आणि स्त्रिया, अंजली कुलकर्णी, २१ एप्रील २०१६.

५. mopharma. Com

६. आदिवासी मंत्रालय महाराष्ट्र राज्य यांचे संकेतस्थळ.

७. वसंतराव नाईक, विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास. महामंडळ, महाराष्ट्र यांची वेबसाईट

८. Indian chronic poverty report 2011-

९. जनगनना २०११.

१०. भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, गीलीन आणि गीलीन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती पान न. ८७

११. युनीयन बजेट २०१०—२०११.

१२. Youth story.com

१३. Team vs Marathi, march 14, 2017, जगण्याचा संघर्ष.

❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh ... (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani